ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

# ग्रामीण महाराष्ट्र आणि रोजगार हमी योजना

*राजविलास रामदास कारमोरे*
सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
विद्या विकास कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर जि. वर्धा

*प्रस्तावना*

भारतामध्ये साधारणतः दोन भागामध्ये बेकारी दिसून येते ग्रामीण बेकारी व नागरी बेकारी. भारतातील ग्रामीण बेकारीची समस्या अतिशय तीव्र स्वरुपाची आहे. भारताच्या ग्रामीण भागात मोसमी बेकारी व छुपी बेकारी आढळून येते. त्याचप्रमाणे भारतातील नागरी भागात औद्योगिक बेकारी व सुशिक्षितांची बेकारी असे दिसून येते. या बेकारीची आपणास विविध कारणे सांगता येतील जसे लोकसंख्येचा विस्फोट, आर्थिक वृध्दीचा कमीदर, अपुरा औद्योगिक विकास, शेतीचा मागासलेपणा, कुटीर व हस्तद्योगांचा —हास शिक्षण पध्दतीतील दोश इ.वरील बेकारी कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या उदा.

कृशि सिंचन वॉटरशेड विकासाला प्राधान्य, लघू व हस्त उद्योगाला प्राधान्य, ग्रामीण आधार, संरचनेची तरतूद, अनौपचारीक क्षेत्राबाबत नवीन व प्रगतीशील दृश्टी, सुचना तंत्रविज्ञानाचा विकास, जनरेखेवर नियत्रंण, रोजगार कार्यालय पध्दतीत सुधारणा, विशेश रोजगार कार्यक्रम. याच दृश्टिकोनातून रोजगार हमी योजना ही भारतात बेकारी व बेरोजगारी दुर करण्यासाठी राबविली जाणारी एक योजना आहे.

***प्रस्तावना***

महाराश्ट्रातील ग्रामीण तसेच 'क' वर्ग नगरपालिका परिशद क्षेत्र धरुन गरीब समाजातील वर्गाला रोजगार उपलब्ध करुन देऊन दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी महाराश्ट्राच्या विधान परिशदेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांच्या शिफारसीवरुन ही रोजगार हमी योजना सुरु झाली. सांगली जिल्हयात तासगाव ग्रामीण बेकारांसाठी 1965 मध्ये प्रथम एक रोजगार योजना चालू करण्यात आली. त्या योजनेचा काही प्रमाणात विस्तार करुन राज्यातील इतर काही तालुक्यांमध्ये रोजगाराची हमी देण्यासाठी 1969 सालापासून ही राबविण्यात आली. 1996—1963 या वर्शापासून रोजगार हमी योजना या नावाने ही योजना राज्यभर लागू झाली परंतू 1962—1963 व 1963—1964 या वर्शी दुश्काळ पडल्याने दुश्काळी कामांमुळे ही योजना फार मूळ धरु शकली नाही. 1974—1975 या वर्शापासून राज्यभर या योजनेचा हिरेरीने पाठपुरावा केला गेला. 1975—1976 या वर्शीच्या राज्याच्या अंदाजपत्रकात विशेश कर बसवून पैशाचीही तरतूद केली गेली. आणि दि. 26 जानेवारी 1979 रोजी महाराश्ट्रात रोजगार हमी कायदा लागू करण्यात आली. समाजातील आर्थिकदृश्टया दुर्बल असलेल्या घटकांना सन्मानाने जगण्यासाठी तसेच त्यांच्या विकासासाठी जाणिवपुर्वक योजना सुरु करणारे राज्य म्हणून महाराश्ट्राने देशात पहिला मान मिळवला तसेच या योजनेने अकुशल कामगारांना रोजगार मिळतो त्यांची बेकारी दुर होते तसेच त्यांची गैर हंगामी उपासमार होते त्याच प्रमाणे त्यांच्या श्रमशक्तीचा वापर केला जातो त्यातूनच स्थायी स्वरुपाच्या संपत्ती मोठया प्रमाणात निर्माण केली जाते. यामुळे इतर राज्यांचे सुध्दा या योजनेकडे लक्ष वेधल्या गेले. वरील कायद्याची फलश्रुती लक्षत घेता राश्ट्रीय स्तरावर ग्रामीण रोजगाराची हमी घेण्याच्या उद्देशाने केंद्रशासनाने ''राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी'' अधिनियम 2005 या नावाने एक वैशिश्टयपूर्ण कायदा लागू केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी सुरुवातीला देशातील 200 जिल्हयात दि. 2 फेब्रुवारी 2006 पासून करण्यात आली आहे. राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रथम टप्यात महाराश्ट्रातील 12 जिल्हयाचा समावेश करण्यात आला. दि. 1/4/2006 पासून दुस—या टप्यात नविन सहा जिल्हयांचा समावेश करण्यात आला. या योजनेच्या कलम 4 व 28 अन्वये महाराश्ट्र शासनाने दि. 23 डिसेंबर 2005 महाराश्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम 1977 दोन्ही कायद्यातील विसंगती दुर करुन अधिक चांगल्या बाबी घेवून नविन महाराश्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्याचे ठरविले.

***महाराश्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची उदिश्टये :—***

ग्रामीण विभागामधील अकुशल व बेकार व्यक्तींना उत्पादक स्वरुपाचा रोजगार पुरवून त्याच्या श्रमशक्तीचा कमाल उपयोग करुन घेणे, ग्रामीण जनतेच्या उत्पन्नामध्ये स्थैर्य निर्माण करणे, त्यांच्या वैयक्तीक लाभदायक योजनांवर कर देणे आणि ग्रामीण विकासाला विविध प्रकारे सहाय्य करणे ही रोजगार हमी योजनेची उदिश्टये आहेत. ही योजना ग्रामीण विभागातील बेकार व्यक्तींना रोजगार पुरविण्याची हमी देते. योजनेच्या व्याप्तीमध्ये खेडयाप्रमाणे 'क' वर्गीय नगरपरिशदांचाही समावेश आहे. हया योजनेमध्ये एका बाजुने हाती घेतलेल्या कामांमधून कायम स्वरुपाची सामूहिक भांडवली फलद्रुव व्हावीत तसेच दुस—या बाजुने बेकार व्यक्तींना देण्यात येणारी मजुरी ही उत्पादनाच्या प्रमाणावर व दर्जावर अवलंबून असावी हयावर भर देण्यात आला आहे.

***ठळक वैशिश्ट्ये :—***

1. ग्रामीण भागात राहणा—या व ''क'' वर्गीय नगरपालीका परिशद क्षेत्रात राहणा—या सर्व प्रौढ व्यक्तींना अकुशल रोजगार पुरविण्यात येतो. तथापी, एखाद्या कुटुंबात एकही व्यक्ती मिळवती नसल्यास त्या कुटुंबातील 15 ते 18 वर्शापर्यंतच्या व्यक्तीस रोजगार देता येतो.
2. हमी जिल्हास्तरावर दिली जाते. काम मागणा—या व्यक्तीला कामाची पसंती करता येणार नाही. जिल्हयात कुठेही काम देण्याबाबत हमी असते असे असले तरी, पंचायत समिती क्षेत्रात बहुधा काम देण्याची पध्दत आहे. रोजगार शोधणा—याच्या राहत्या ठिकाणापासून 8 कि. मी. त्रिज्येत जर रोजगार उपलब्ध नसेल तर 8 कि. मी. च्या बाहेर जिल्हयात कोठेही रोजगार देण्यात येतो व अशा वेळी आवश्यक ती राहण्याची व्यवस्था व प्रवास खर्चाची व्यवस्था केली जाते. (एकदा कामावर जातांना व पुन्हा काम संपल्यावर किवा बंद झाल्यावर घरी परततांना.)
3. कामाची अंमलबजावणी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, कृशि,, वन यांसारख्या शासकीय विभागांमार्फत व जिल्हा

परिशदांमार्फत करण्यात येते. अंमलबजावणी करणा–या सदर शासकिय/ जिल्हा परिशद विभागास "कार्यान्वित यंत्रणा" असे म्हणतात.

4. या योजनेखाली नियमानुसार रोजगार इच्छुकाने फॉर्म क. 1 मध्ये आपले नांव गावातील नोंदनी अधिका–याकडे (तलाठी/ ग्रामसेवक) नोंदवावे लागते. त्यानंतर फॉर्म क. 4 भरुन त्याने/ तिने समिती अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे किंवा संबंधीत गावाच्या नोंदनी अधिका–याकडे रोजगार हमी योजनाखाली कामाची मागणी करावयाची असते. या योजनेनुसार फॉर्म क. 4 मधील अर्ज म्हणजेच कामाची मागणी आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत समिती अधिका–याने काम पुरवावयाचे आहे. समिती अधिका–याने दर्शविलेल्या कामावर निदान 30 सातत्याने काम करण्यासंबंधी रोजगार शोधणा–याने घोशना करणे आवश्यक आहे. समिती अधिकारी फॉर्म क. 7 अन्वये रोजगार मागणा–यास कार्यान्वित यंत्रणेकडे पाठवितो. समिती अधिका–यांच्या पत्रासह सात दिवसांच्या आत काम मागणारी व्यक्ती स्वतः हजर झाल्यास कार्यान्वयीन यंत्रणेने त्या व्यक्तीला कामावर लावून घ्यावे. काम न देता आल्यास काम करणा–या व्यक्तीस दर दिवशी रु. 10/– प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्याची जबाबदारी राज्यास उचलावी लागते.

***कामाचे स्वरुप :–***

या योजनेखाली प्रामुख्याने उत्पादक स्वरुपाची कामे घेण्यात येतात. राज्यातील दुश्काळाची पुनरावृत्ती कमी करण्यासाठी जलसंधारण कामांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. रोहयो अंतर्गत प्रामुख्याने खालील कामे घेण्यात येतात.

1) सिंचनाची कामे :– जलसंधारणाची कामे ज्यात पाझर तलाव, गावतळी, वनतळी, पाटबंधारे प्रकल्पातील श्रमप्रधान व जलसंवर्धनाची कामे.
2) मृदसंधारण व भू–विकास कामे.
3) वनीकरण व सामाजिक वनीकरणची कामे.
4) रस्ते व इतर (1981 ते 2001) विकास आराखडयातील).
5) गावातील अंतर्गत रस्ते.
6) वैयक्तिक लाभदायक योजना (उदा. जवाहर विहिरी, फळझाड लागवड इ.)

अकुशल कुशल कामाचे प्रमाण ल. पा. तलाव, पाझर तलाव, गांवतलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, गॅबियन बंधारे व रस्ते याकरिता आता 51:49 असे करण्यात आले आहे. उर्वरीत कामासाठी अकुशल कुशल प्रमाण पूर्विप्रमाणेच 60:40 ठेवण्यात आले आहे.

***मजुरांना मजुरी :–***

बहुशः हजेरीपटावरील मजुरांकडून विभागामार्फत कामे केली जातात. मात्र कामगारांना त्यांच्या हजेरीनुसार मजुरी न देता त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात प्रत्येक कामाचे जे दर निश्चित केले आहेत त्यानुसार मजूरी दिली जाते. विविध कामांचे हे दर अशाप्रकारे ठरविण्यात आले आहेत की, सर्वसामान्य व्यक्तीने रोज 7 तास व्यवस्थित काम केल्यास त्याला त्या भागातील शेतमजुरास किमान मजुरी कायद्यानुसार मिळणा–या मजुरीएवढी मजुरी मिळू शकेल. तथापी, याला धरण बंधा–याला मधोमध सिमेंटच्या भिंतीचा आधार देणे, या कामाचा अपवाद केला आहे. हे काम पावसाळयापूर्वी पूर्ण होण्यासाठी प्रासंगिक (कंत्राट) कामगारांकडून पूर्ण करुन घेण्यात येते. त्यामुळे अर्धवट झालेली कामे पाण्याने वाहून जाण्याचा धोका टळतो. तव्दतच कालव्याच्या कामासंबंधीत खडक स्फोटाचे काम याला अपवाद आहे. सध्या दि. 26/3/2011 पासूनचे प्रतिदिनी मजूरीचे दर पुढीलप्रमाणे आहेत :– परिमंडळ 1–51 रुपये : परिमंडळ 2–49 रुपये : परिमंडळ 3 –47 रुपये :परिमंडळ 4 – 45 रुपये.

***मजुरांना सुविधा व सोयी सवलती :–***

1. कामांच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते. दुपारच्या सुट्टीत विश्रांतीसाठी निवा–याची सोय केली जाते. कामावर प्रथमोपचाराचे औशधी साहित्य उपलब्ध केले जाते. खडी फोडणा–या मजूरांस तारेचे चश्मे पुरविले जातात.

2. कामावरील मजुरास अपघात होवून मृत्यू आल्यास त्याच्या वारसांना रु. 50,000/– इतके सानुग्रह अनुदान दिले जाते. अपघातात अपंगत्व आल्यास अपंगत्वाच्या टक्केवारीप्रमाणे अनुदान दिले जाते. तसेच 100 टक्के अपंगत्व आल्यास रु. 50,000/– इतके सानुग्रह अनुदान दिले जाते.

3. रोहयो मजुरांनी सोबत आणलेल्या अल्पवयीन मुलां–मुलांना अपघात झाल्यास त्यांना रोहयो मजुरांप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येते.

4. रोहयोच्या कामावरील स्त्री मजुराने प्रसुतीपुर्वी वर्शभरात किमान 75 दिवस काम केले असल्यास तिला प्रसुतीसाठी 15 दिवस रजा देण्यात येते. या रजेच्या काळात तिला त्या परिमंडळात देय असलेल्या दरानुसार प्रतिदिनी मजुरीइतकी रक्कम सानुग्रह अनुदान देण्यात येते. जर 75 दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केले असल्यास पुढील प्रत्येक 5 दिवसांसाठी 1 दिवस अधिकची रजा व वेतन दिले जाते. सदर सवलत जास्तीत जास्त 150 दिवसांसाठी दिली जाते. म्हणजेच 150 दिवस काम केले असल्यास तिला 30 दिवसाच्या मजुरीइतकी मजुरी इतके सानुग्रह अनुदान म्हणून दिले जाते.

5. कुटुंब नियोजनाची शस्त्रकिया करून घेतल्याबद्दल स्त्री मजुरास 14 दिवस व पुरूश मजुरास 7 दिवस कामावर गैरहजर राहण्याची परवानगी देता येते व त्या काळासाठी प्रलिदिनी मजुरीदराने सानुग्रह अनुदान दिले जाते.

6. स्त्री मजुराने मागील दोन अ्राठवडयात किमान पाच दिवस काम केले असल्यास कुटुंब नियोजनाकरिता तांबी बसविण्याकरिता 2 दिवसाची रजा व रजेच्या किमान वेतनाइतके सानुग्रह अनुदान दिले जाते.

***कामाचे नियोजन :–***

श्रमिकासाठी जास्तीत जास्त मजुर क्षमतेची कामे उपलब्ध करता येतील अशा प्रकारे योजना राबविण्यात येते. जिल्हयातील नेहमीच्या शेतीच कामांवर मजुरांअभावी विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जोत. तसेच इतर योजनांतर्गत किंवा योजनांतर्गत किंवा योजनेवर कामे चालु असताना ही योजना अंमलात आणली जात नाही. जिल्हाधिकारी जिल्हयासाठी 1 ऑक्टोबर ते 30 सप्टेंबर या पुढील वर्शाच्या काळासाठी रोजगार हमी योजनेबाबत वार्शीक योजना तयार करतात. चालु योजनाव्यतिरीक्त इतर मंजुर कामे/योजनाही तयार ठेवण्यात येतात. त्यामुळे पुढील वर्शात जो रोजगार पुरविला जाऊ शकतो (मनुश्य दिवसात) तो सभाव्य सर्वसाधारण रोजगाराच्या 150 टक्के रोजगाराची गरज भागवू शकतो.

रोजगार हमी योजनेखालील कामांची मजुरी व अंमलबजावणी :–

जिल्हाधिकारी रूपये 50 लाख खर्चापर्यन्तची कामे मंजुर करू शकतात व आयुक्त रूपये 75 लाखा पर्यंतची कामे मंजुर करू शकतात. रूपये 75 लाखांवरची कामे राज्यशासनाकडुन मंजुर करण्यात येतात.

***कामे सुरू करण्याची अट :–***

शेती कामावर तसेच योजनांतर्गत व योजनेतर शासकीय/स्थायी कामावरील मजुरांची गरज प्रथम पुर्ण भागविण्यात यावी. त्यानंतर रोजगार हमी योजनेवरील संभाव्रू मजुरांचा पूर्णतया वापर करण्यात यावा व नंतरच नवीन कामे चालु करण्यात यावीत. या योजनेखाली आदिवासी व वनक्षेत्राकरिता 15 व इतर क्षेत्राकरिता किमान 25 उपलब्ध असल्यास नवीन कामे चालु करण्यात येतात.

***योजनेच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा व्यवस्था :–***

कार्यक्रमावर परिणामकारक व सतत संपर्क व नियंत्रण राहण्यासाठी त्रिस्तरीय प्रशासकीय यंत्रणेची उभारणी करण्यात आली आहे. नियोजन, दिग्दर्शन, नियंत्रण व समन्वय यासाठी राज्य, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर समित्या नेमण्यात आल्या आहेत. राज्यस्तरावर नियोजन विभागाकडे या कार्यक्रमाची सर्व सुत्रे आहेत. यात नियोजन, प्रशासन निधीची तरतुद, कार्यक्रमाचे संनियंण व मूल्यमापन या बाबींचा अंतर्भाव होतो. महसूल विभागाचे आयुक्त आपल्या विभागात रोजगार हमी योजनेचे नियत्रंण करतात. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी या कार्यक्रमाचे सर्व काम बघतात. पंचायत समिती स्तरावर पंचायत क्षेत्रात कामाच्या मागणीचा अंदाज घेणे व विविध कामांवर कामगारांची योजना करणे ही कामे तहसिलदारांकडे सोपविण्यात आली आहेत. नियोजन विभाग अर्थसंकल्पीय तरतुद करते व जिल्हाधिका–यांना त्रैमासिक पतमर्यादा कळविली जाते. त्यानंतर जिल्हाधिकारी आपल्या अधिकारात जिल्हास्तर अंमलबजावणी अधिका–यांना निधी पुरवितात. ते अधिकारी हा निधी कामांसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी उपविभागीय अधिका–यांना वितरीत करतात. शासनाने विहित केलेल्या नेहमीच्या पध्दतीनुसार प्राथमिक स्तरावर कार्यान्वयीन यंत्रणाअधिकारी व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी हिशोब ठेवतात.

रोजगार हमी योजनेचे साप्ताहीक व मासिक प्रगती अहवाल मागविण्यात येतात. हे अहवाल कार्यान्वयीन यंत्रणेकडून जिल्हाधिका–यांकडे नियोजन विभागास सादर करण्यासाठी पाठविण्यात येतात. चालू असलेली कामे, त्यावरील मजूर क्षमता, मजूर उपस्थिती इत्यादी माहिती साप्ताहिक अहवालात असते. मंजूर कामे, पूर्ण झालेली कामे, चालू काम,मजूर क्षमता, महिन्याअखेरची मनुश्यदिवस निर्मिती, महिन्याभरातील एकूण मजुरीपोटी झालेला खर्च इत्यादी बाबीचा मासिक अहवालांत समावेश असतो.

***साधन संपत्ती :–***

1)योजनेच्या अंमलबजावणीकरिता साधनसंपत्ती उभारण्यासाठी राज्य शासनाने खालील विशेश कर लावले आहेत. :–

व्यवसाय, व्यापार व रोजगार यावरील कर.

रोजगार हमी योजनेसाठी वाहनांवरील अतिरिक्त कर.

रोजगार हमी योजनेसाठी विक्री करावरील अतिरिक्त कर.

ओलीताखालील शेत जमिनीचा विशेश कर अंदाज.

रोजगार हमी योजनेसाठी जमीन महसुलावरील सरचार्ज.

रोजगार हमी योजनेसाठी महाराष्ट्र बिगर निवासी नागरी जमिनी व इमारती यांवर कर.

सर्व करांव्दारे प्राप्त झालेल्या उत्पन्नाएवढेच समान प्रमाणात राज्य शासनसही रोजगार हमी योजनेसाठी दरवर्शी अंशदान देते.

2) या योजनेअंतर्गत समाविश्ठ झालेल्या सर्व लाभार्थींना त्यांनी केलेल्या कामानुसार मजुरीसाठी देयअसेलेल अनुदान 100 टक्के देण्यात येते. तथापी, सामग्रीसाठी देय असलेले 100 टक्के अनुदान हे अनुसुचित जाती/जमाती, नवबौध्द, भटक्या जमाती, विमुक्त जमाती तसेच नाबार्डच्या व्याख्येनुसार असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतक–यांना देण्यात येते, तर उर्वरीत शेतक–यांना सामुग्रीसाठी देय असलेल्या अनुदानाच्या 75 टक्के देण्यात येते व 25 टक्के देय रक्कम लाभार्थीने सोसावयाची आहे. (मोठे शेतकरी)

3) फळझाड लागवड योजना ज्या शेतक–यांकडे स्वतःची जमीन आहे असे शेतकरी विश्वस्त कायद्याखाली संस्था, सहकारी कायद्याखाली मान्यताप्राप्त संस्था हे या योजनेचा लाभ घेऊ शेकतात.

***रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर विहिर कार्यक्रम :–***

ही जवाहर विहिर कार्यक्रम केंद्र शासनाच्या जीनवनधारा विहिर योजनेच्या धर्तीवर राज्यात रोजगार हमी योजनेखाली दि. 1 सप्टेंबर, 1988 पासून सुरु करण्यात आली. रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहिर कार्यक्रम 1988–89 या वर्शापासून मर्यादित प्रमाणात राबविण्यात येत होता. दि. 24 डिसेंबर, 1991 च्या शासन आदेशान्वये जवाहर विहिर कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून शेतक–यांच्या शेत जमिनीवर मोठया प्रमाणत विहिरींचा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. हा सुधारीत कार्यक्रम नाबार्डच्या व्याख्येप्रमाणे अप्ल भुधारक शेतक–यांच्या जमिनीवर राबविला जात आहे. एकूण लाभााार्थ्यांपैकी 60 टक्के लाभार्थ्यांची निवड अप्ल भुधारक शेतकरी (दोन हेक्टर पर्यंत जमीन असलेले) त्यापैकी 50 टक्के लाभार्थ्यांची निवड मागासवर्गीयांमधून (अ.जा./अ.ज./भ.ज./नवबौध्द) करण्यात येते. याचा अर्थ असा की, 40 टक्के लाभार्थी 2 हेक्टरपेक्षा अधिक जमीन असलेले अल्प भुधारक, 30 टकके लाभार्थी 2 हेक्टर जमीन असलेले व उर्वरीत 30 टक्के लाभार्थी 2 हेक्टरपर्यंत जमीन असलेले अ.जा./अ.ज./भ.ज./नवबौध्द यामधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.

रोजगार हमी योजने अंतर्गत खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड :–

राज्यात जलसंधारण, मृदसंधारण योजनांची अंमलबजावणी करुन उत्तम समन्वय साधण्याच्या दृश्टीने शासनाने जलसंधाररणाचे कार्य हाती घेतले आहे. त्यामध्ये व्यापक पाणलोट क्षेत्र विकासाचे अविभाज्य घटक म्हणून पाणलोट क्षेत्राच्या वरच्या भागात सामाजिक वनीकरणाच्या कामांना गती व चालना देण्यासाठी राज्यातील पडीक व अवनत जमीन, उत्पादनक्षम करणे,, वृक्ष छायेखाली आणणे ही उद्देशपूर्ती करण्यासाठी ''रोजगार हमी योजनेशी निगडीत सामाजिक वनीकरण'' अंतर्गत शेतक–यांना फायदा मिळण्याच्या दृश्टीने खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी ही योजना 1992.–1993 पासून राबविण्यास शासनाने सुरुवात केली आहे. ग्रामीण भागातील सरपण, चारा, गवत, इंधन व किरकोळ लाकूडफाटयाची गरज भागविण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

सांख्यिकी माहिती

सन 1972–73 ते 2003–04 च्या दरम्यान रोहयो च्या सर्व उपाययोजना एकूण काम व त्यासाठीचा खर्च व मनुष्य दिवस निर्मिती माहिती दर्शविणारा तक्ता.

सन 1972–73 पासून रोजगार हमी योजना अंतर्गत वर्षवार एकूण खर्च व निर्माण झालेले मनुष्यदिवस इत्यादी बाबत माहिती दर्षविणारी तक्ता.

| वर्ष | आर्थिक तरतूद | एकूण खर्च | अकूशल खर्च | अकूशल खर्चाची टक्केवारी | मनुष्य दिवस निर्मिती | प्रति मनुष्य दिवस खर्च | सरासरी प्रति मनुष्य दिवस मजुरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1972–1973 | 2.23 | 1.88 | उ.ना | –– | 0.45 | 4.18 | –– |
| 1973–1974 | 3.71 | 7.89 | उ.ना | –– | 0.51 | 3.71 | –– |
| 1974–1975 | 15.00 | 13.72 | उ.ना | –– | 4.81 | 2.85 | –– |
| 1975–1976 | 30.49 | 34.61 | 31.48 | 90.95 | 10.95 | 3.16 | –– |
| 1976–1977 | 50.00 | 51.10 | 38.35 | 75.04 | 13.65 | 3.74 | 2.81 |
| 1977–1978 | 55.00 | 51.54 | 38.13 | 73.98 | 11.73 | 4.39 | 3.25 |
| 1978–1979 | 70.63 | 74.17 | 59.03 | 79.58 | 16.35 | 4.49 | 3.61 |
| 1979–1980 | 100.40 | 109.23 | 89.45 | 81.89 | 20.54 | 5.32 | 4.36 |
| 1980–1981 | 110.90 | 122.12 | 92.69 | 75.90 | 17.15 | 7.12 | 5.40 |
| 1981–1982 | 116 | 126.17 | 98.09 | 77.74 | 15.60 | 8.09 | 6.28 |
| 1982–1983 | 125.66 | 130.93 | 99.78 | 76.20 | 12.80 | 10.23 | 7.80 |
| 1983–1984 | 157.34 | 184.98 | 139.37 | 75.34 | 16.45 | 11.24 | 8.41 |
| 1984–1985 | 155.74 | 232.04 | 147.77 | 63.68 | 17.80 | 13.04 | 8.30 |
| 1985–1986 | 246.55 | 272.24 | 181.99 | 66.85 | 18.95 | 14.37 | 9.60 |
| 1986–1987 | 226.08 | 243.43 | 154.37 | 63.47 | 18.76 | 12.98 | 8.23 |
| 1987–1988 | 265.24 | 288.31 | 253.36 | 53.19 | 13.33 | 19.06 | 9.11 |
| 1988–1989 | 250.00 | 254.23 | 126.26 | 50.00 | 8.13 | 31.27 | 15.02 |
| 1989–1990 | 231.54 | 239.28 | 123.04 | 53.30 | 7.80 | 30.68 | 15.53 |
| 1990–1991 | 236.97 | 238.92 | 134.82 | 57.37 | 8.98 | 26.16 | 15.02 |
| 1991–1992 | 310.95 | 319.92 | 202.00 | 63.14 | 11.94 | 26.79 | 16.91 |
| 1992–1993 | 453.23 | 452.72 | 273.00 | 60.30 | 14.80 | 30.59 | 18.45 |
| 1993–1994 | 313.62 | 347.34 | 183.00 | 52.69 | 9.84 | 35.30 | 18.60 |
| 1994–1995 | 413.15 | 384.09 | 268.55 | 69.92 | 9.42 | 40.77 | 28.51 |
| 1995–1996 | 450.00 | 443.75 | 269.53 | 63.00 | 9.70 | 45.75 | 28.82 |
| 1996–1997 | 418.25 | 366.75 | 256.73 | 70.00 | 8.18 | 40.70 | 28.49 |
| 1997–1998 | 360.00 | 353.00 | 257.69 | 73.00 | 9.00 | 39.22 | 28.63 |
| 1998–1999 | 489.00 | 456.66 | 324.23 | 71.00 | 9.11 | 49.69 | 35.28 |
| 1999–2000 | 495.25 | 493.97 | 370.48 | 75.00 | 9.49 | 52.03 | 39.04 |
| 2000–2001 | 667.03 | 578.00 | 439.28 | 76.00 | 11.12 | 52.55 | 39.50 |
| 2001–2002 | 669.10 | 914.65 | 731.73 | 80.00 | 16.17 | 56.56 | 45.28 |
| 2002–2003 | 850.00 | 889.00 | 711.20 | 80.00 | 15.45 | 57.54 | 46.03 |
| 2003–2004 | 1050.00 | 1051.52 | 930.32. | 93.00 | 18.53 | 62.80 | 56.75 |
| 2004.2005 | 929.01 | 1256.47 | | | 22.84 | 55 | |

सन 1990–91 पासून कामाच्या प्रकारानुसार एकूण खर्चाची टक्केवारी दर्षविणारा तक्ता

| एकूण खर्चाची टक्केवारी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | पाटबंधारे | कृषी | वनीकरण | रस्ते | इतर (पगार भत्ते इ.) | श्रमषक्ती फळझाडे जवाहर विहीर | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1990–1991 | 14.7 | 13.4 | 16.5 | 19.3 | 22.6 | 13.5 | 100 टक्के (238.92) |
| 1991–1992 | 14.9 | 15.6 | 15.5 | 19.6 | 11.5 | 22.9 | 100 टक्के (319.92) |
| 1992–1993 | 18.8 | 20.7 | 11.4 | 21.6 | 10.0 | 17.5 | 100 टक्के (452.72) |
| 1993–1994 | 18.1 | 19.3 | 11.5 | 19.4 | 6.4 | 25.4 | 100 टक्के (347.64) |
| 1994–1995 | 14.3 | 23.2 | 8.8 | 15.2 | 17.2 | 21.3 | 100 टक्के (384.09) |
| 1995–1996 | 13.1 | 26.8 | 7.1 | 11.6 | 17.7 | 23.7 | 100 टक्के (443.75) |
| 1996–1997 | 14.9 | 14.2 | 8.3 | 14.3 | 8.5 | 39.8 | 100 टक्के (366.75) |
| 1997–1998 | 17.1 | 8.6 | 11.00 | 16.6 | 12.00 | 34.7 | 100 टक्के (353.00) |
| 1998–1999 | 16.7 | 6.8 | 11.6 | 23.4 | 7.8 | 33.7 | 100 टक्के (456.66) |
| 1999–2000 | 11.9 | 6.7 | 11.6 | 27.2 | 13.8 | 28.8 | 100 टक्के (493.97) |
| 2000–2001 | 9.1 | 13.8 | 12.9 | 28.2 | 9.5 | 26.5 | 100 टक्के (578.00) |
| 2001–2002 | 21.5 | 13.6 | 11.2 | 32.0 | 4.8 | 16.9 | 100 टक्के (914.65) |
| 2002–2003 | 12.3 | 26.3 | 9.7 | 28.3 | 8.1 | 15.3 | 100 टक्के (889.00) |
| 2003–2004 | 17 | 47 | 7 | 24 | 5 | — | 100 टक्के (1050.71) |
| 2004.2005 | 10 | 55 | 8 | 17 | 1 | 9 | 100 टक्के (1256.47) |
| (कंसात दर्षविलेले खर्चाचे आकडे कोटीत असून इतर खर्चाचे टक्केवारी कर्मचारी, यंत्रसामग्री इ. चा समावेष आहे.) | | | | | | | |

### *नृिष्कर्श*

रोजगार हमी योजना ही बेकारी व बेरोजगारी दुर करण्याच्या व आर्थिक दृश्टया कमजोर कुटुंबाच्या आर्थिक उन्नत्तीच्या दृश्टीकोनातून राबविली जाणारी योजना आहे. या योजनेत साधारणपणे 71 टक्के लाभार्थी ग्रामीण भागातील आढळून येते. त्यामुळे ग्रामीण भागाातील बेकारी व बेरोजगारी दुर करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील लहान–लहान खेडी रस्त्याने जोडण्यासाठी तसेच दारिद्रय रेशेखाली कुटुंबांच्या आर्थिक विकासात भर घालण्यासाठी

या योजनेचा फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. त्याच प्रमाणे या योजणेव्दारे ग्रामीण भागातील श्रमिकांची कामाचे तास वेतन दर संबंधी पिळवणुकीस आळा बसतो कारण या योजनेने कामाचे तास व वेतनदर यात नियमितपणा व श्रमाचे तास व मोबदला यात समरुपता प्रस्थापीत होते. तसेच या योजने व्दारे ग्रामीण भागातील मजुरी वाढण्यास मदत होते अणि त्यामुळे ग्रामीण भागातील श्रमीकांचे स्थलांतरण थांबण्यास मदत होते.

या योजनेने ग्रामीण भागातील श्रमिकांना वर्श भरात कमीम कमी 100 दिवस रोजगार मिळण्याची श्वाश्वती असते तसेच या योजनेत जवळपास 35 प्रकारची कामे पूर्ण केली जातात. असे निदर्शणात येते की, या योजनेव्दारे ग्रामीण भागातील पाणी समस्या तसेच जवाहरी विहिर योजना तसेच पाठबंधारे विभागातील कामाव्दारे जलसिंचनाच्या सोयी पुर्ण होत आहेत. तसेच फलोत्पादन व शेततळी मुळे ग्रामीण भागातील कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येंते. तसेच या योजनेव्दारे ग्रामीण भागातील पडीक जमिनीचा उठाव होत आहे.

या योजनेत दिल्या जाणा–या अपु–या सुविधा व या योजनेतील गैरप्रकार व शोशणास आळा या उणीवात सुधारणा केल्यास. ग्रामीण भागातील बेकारीच्या समस्या, मजुरीदराच्या समस्या,, सिंचनाच्या समस्या, रस्त्ये जोडणीच्या समस्या, पडीक जमिनीच्या समस्या, स्थलांतरच्या समस्या, पाणी पुरवण्याच्या समस्या, आर्थिक प्रगतीच्या समस्या इत्यादींवर मात करण्यासाठी ही रोजगार हमी योजना महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

### *संदर्भ ग्रंथसुचि* –

1. स्थुल अर्थशास्त्र – जे.एम. झामरे
2. अर्थशास्त्र – के.एच. ठक्कर
3. भारताची अर्थव्यवस्था – डॉ. प्रभाकर देशमुख
4. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. सुधाकर शास्त्री
5. विशेश आर्थिक क्षेत्र – गोविलकर डॉ. विनायक
6. योजना –
7. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. देसाई , डॉ भालेराव
8- http://mahaege.nic.in